# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

**दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१** E-Mailhomebranchpune@gmail.com


जि.का/क्र.आ.व्य /कावि/०३ /२०२२ दिनांक ०४/०१/२०२२

---

१ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005

२ भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

३ सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, यांचेकडील अधिसुचना कोरोना/२०२०/प्र.क्र.-५८/ दि.१४/०३/२०२०

४ महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील, आदेश क्र.कोरोना/२०२१/सीआर.३६६/आरोग्य-५, दि ०२/०८/२०२१,११/०८/२०२१ , १६/०८/२०२१ ,२४/०९/२१

५ या कार्यालयाकडील आदेश दिनांक ०२/०४/२०२१,१४/०४/२०२१, २०/०४/२०२१, २२/०४/२०२१, २९/०४/२१,१३/०५/२०२१, १४/०५/२०२१ दिनांक २८/०५/२०२१, ३१/०५/२०२१, ०५/०६/२०२१, ०८/०८/२०२१ , १५/०८/२०२१ ,१७/०८/२०२१,१६/०९/२१ , ०४/१०/२०२१ व ९/१०/२०२१.

६ उप सचिव,गृह विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक आरएलपी/१२२१/प्र.क्र./२८०/विशा १ब दिनांक २३/१२/२०२१

७ मा.मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/२०२०/सी.आर.९२/डीएसएम-१ दिनांक २७/११/२०२१ व दिनांक २४/१२/२०२१ व दिनांक ३०/१२/२०२१.

८ मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांची दिनांक 04/01/2022 रोजीची बैठक

---

**विषय :- कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरियंटचा संसर्ग रोखण्याकरिता उपायोजना करण्याबाबत.**

**आदेश**

**ज्याअर्थी**, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक १४ मार्च, २०२० चे पत्रान्वये कोरोना विषाणु (कोविड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ हा दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली आहे. जिल्हाधिकारी यांना पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्र ग्रामपंचायत,नगरपालिका,नगरपरिषद,नगरपंचायत कार्यक्षेत्रात कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत. तसेच पुणे व खडकी छावणी परिषद कार्यक्षेत्राचा समावेश पुणे महानगरपालिका हद्दीजवळ व देहुरोड छावणी परिषद कार्यक्षेत्राचा समावेश पिंपरी चिंचवड महानगर पालिका हद्दीजवळील क्षेत्रात होत आहे.

**आणि ज्याअर्थी**, कोरोना विषाणूचा प्रसार ओमायक्रॉन व्हेरियंटसह ,अत्यंत वेगाने होत आहे. कोरोना विषाणू तसेच ओमायक्रॉनचा प्रसार होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसुन येत आहे. बाधित व्यक्तींची संख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेता व सदयस्थितीमध्ये रुग्णवाढीचा वाढता दर विचारात घेता अधिक निर्बंध लागू करणे आवश्यक असल्याचे वरील वाचले क्रमांक ७ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

**त्याअर्थी, मी राजेश देशमुख,** जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५, भारतीय साथरोग अधिनियम, १८९७ अन्वये तसेच मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०४/०१/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या सुचनेनुसार पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील क्षेत्र ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीत कोव्हिड-१९ तसेच ओमायक्रॉन व्हेरियंटच्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे **आदेश निर्गमित करीत आहे.**

१ पुणे जिल्हयातील ग्रामीण कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय व खाजगी पहिली ते आठवी पर्यंतच्या शाळा दिनांक ३०/०१/२०२२ पर्यंत बंद राहतील. मात्र ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील.

२ सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी तसेच कामाच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक तसेच खाजगी वाहनातून प्रवास करताना मुखपटटी/मास्क वापरणे बंधनकारक राहील. तसे न केलेस संबंधित व्यक्तीवर र.रु. 500/- अशी दंडात्मक कार्यवाही करणेत येईल.

३ सर्व शाळा, महाविद्यालये, दुकाने, खाजगी व सरकारी कार्यालये, बँका, औद्योगिक आस्थापना, उपहारगृहे, बार, मॉल मालक व इतर आस्थापनांनी / व्यवस्थापनाने त्यांचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व व्यवस्थापक, अधिकारी तसेच कर्मचा-यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पुर्ण झाल्याची खातरजमा करावी व या कर्मचा-यांची यादी प्रमाणपत्रासह तयार ठेवावी. सक्षम प्रधिका-यांनी यादी तपासणीसाठी मागणी केल्यास त्यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच सर्व सामान्यपणे काही अपवादात्मक परिस्थिती / अतितातडीची बाब वगळता त्यांच्या कार्यालयात किंवा आस्थापनेत येणा-या सर्व नागरिकांनाही लसीकरणाच्या दोन मात्रा पुर्ण केल्याची खात्री करूनच प्रवेश देण्यात यावा. (नो मास्क - नो एंट्री, नो वॅक्सीन - नो एंट्री)

४ सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी तसेच कामाच्या ठिकाणी तसेच सर्व नागरिकांनी सार्वजनिक तसेच खाजगी वाहनातून प्रवास करताना थुंकल्यास संबंधित व्यक्तीवर र.रु. 1,000/- अशी दंडात्मक कार्यवाही करणेत येईल.

५ **पुणे व खडकी छावणी परिषद-** पुणे व खडकी छावणी परिषद कार्यक्षेत्र पुणे महानगरपालिका हद्दीजवळ येत असल्याने तेथे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे आदेशातील कोरोना निर्बंधविषयक अटी व शर्ती लागू राहतील.

६ **देहुराड छावणी परिषद-** देहुराड छावणी परिषद कार्यक्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीजवळ येत असल्याने तेथे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेशातील कोरोना निर्बंधविषयक अटी व शर्ती लागू राहतील.

**यापुर्वी संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले कोरोना निर्बंधविषयक आदेश / मार्गदर्शक सूचना व निर्बंध पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रात दि.०५.०१.२०२२ पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.** कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

**सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. ०४.०१.२०२२ रोजी दिलेला आहे.**

**(डॉ.राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे**

प्रति,

१ मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका पुणे/ पिंपरी-चिंचवड यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
२ मा. पोलिस आयुक्त पुणे शहर व पिंपरी -चिंचवड यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
३ आयुक्त पी.एम.आर.डी.ए यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी
५ पोलीस अधिक्षक पुणे ग्रामिण.
६ अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,पुणे यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
७ महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
८ उपविभागीय दंडाधिकारी सर्व
९ तहसिलदार सर्व/गट विकास अधिकारी सर्व/गट शिक्षण अधिकारी सर्व
१० मुख्यअधिकारी सर्व/ नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत ,मुख्य कार्यकारी अधिकारी छावणी परिषद पुणे, खडकी, देहुरोड यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
११ व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,येरवडा कारागृह पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी रवाना.

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी पुणे यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रतः-मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडे माहितीसाठी सादर.